जा.क्र.कृ.आ/विप्र-२/गति.कड/मा.सु/खरीप-१२-१३/**प्र.क्र.१**/२८६/१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,
पुणे-४११००५ **दि. ७/५/२०१२.**

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सहसंचालक**

**................................**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**

**....................................**

**विषय- गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) खरीप हंगाम सन-२०१२-१३ मार्गदर्शक सुचना.**

संदर्भ- १) केंद्र शासनाचे १८ एप्रिल २०१२.

<u>**सदर कार्यक्रम राबविताना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.**</u>

सोबत प्रपत्र १ मध्ये जिल्हानिहाय, पिकनिहाय राबवावयाच्या ५०० हेक्टर क्षेत्राच्या प्रकल्पांची संख्या दिली आहे. **कडधान्य पीकाची उत्पादकता कमी असलेलया तालुक्याची निवड करण्यात यावी व तालुक्यातील कमी उत्पादकता असलेल्या गावामध्ये सदर प्रकल्प राबविण्यात यावेत. गतवर्षी ज्या गावात गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) प्रात्यक्षिके घेण्यात आली ती गावे परत निवडण्यात येऊ नयेत.**

गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम सन २०१२-१३ मध्ये राबविताना ५०० हे.च्या लघुप्रकल्पामध्ये राबविणे बंधनकारक आहे. <u>**परिशिष्ठ अ**</u> मध्ये दर्शविलेल्या बाबीचे पायाभुत सर्वेक्षण करुन या प्रकल्पाचे उद्दीष्ट काय रहाणार आहे व त्यावरुन जो परीणाम अपेक्षित आहे याची नीट मांडणी करुन प्रकल्प तयार करण्यात यावेत. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर त्यात कितपत यश आले आहे ते नमुद करुन प्रगति अहवाल तयार करण्यात यावेत. तसेच त्याची विविध बाबींच्या फोटोसहीत यशोगाथा तयार करण्यात यावी. प्रकल्प आराखडा यशोगाथा, तदअनुषंगित संकिर्ण खर्च व अधिकारी भेटीसाठी प्रती प्रकल्प रु.१६१००/- मंजूर करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कडधान्य योजनेमध्ये १०० हेक्टरचे लघुप्रकल्प करण्यात आले असुन सदर लघुप्रकल्पाअंतर्गत निवडण्यात आलेली गावे वगळुन हा कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रमामध्ये यापुर्वी लाभ दिलेल्या गावांची निवड कोणत्याही परिस्थीतीत करु नये.

<u>**परिशिष्ठ - अ**</u>

**प्रकल्प अहवाल तयार करताना खालील बाबींचे मुलभुत सर्वेक्षण करण्यात यावे**

अ) निवडलेल्या क्षेत्रातील पीकनिहाय क्षेत्र, पीक पध्दती

ब) पीकनिहाय वाणाखालील क्षेत्र व वाण निहाय उत्पादकता.

क) जमिन आरोग्य पत्रिका नुसार जमीनीचा सामु तसेच उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश व सुक्ष्ममुलद्रव्ये.

ड) उपलब्ध सिंचन सुविधा त्यातील सिंचना खालील क्षेत्र व कडधान्य पिकासाठी उपलब्ध हाणारे सिंचन.

इ) उपलब्ध ट्रॅक्टर/पॉवर टीलर/बैल जोडी संख्या तसेच औजारे निहाय उपलब्धता.

ई) पीकनिहाय निविष्ठा वापराचे प्रमाण.

फ) उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळ.

ग) निविष्ठा उपलब्धतेच्या सुविधा तसेच तयार झालेल्या कृषि मालाची पणन व्यवस्था.

http://mahaagri.gov.in/

# <u>गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) सर्वसाधारण सूचना</u>

१. उपविभागीय कृषि अधिकारी हे या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून काम करतील.

२. निवडलेल्या प्रकल्पासाठी कृषि अधिकारी/कृषि पर्यवेक्षक प्रभारी अधिकारी म्हणून काम पाहतील.

३. निवडलेल्या तालुक्यातील गांवे निश्चित करुन कडधान्य पिकांचे उत्पादक शेतकरी निवडण्यात यावेत. निवडलेल्या क्षेत्रातील सर्व गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) अतंर्गत कडधान्य उत्पादक शेतकरी असतील. या शेतक-याकडुन सोबत दिलेल्या नमुन्यात **समंतीपत्र** घेण्यात यावे. त्यानंतर गटप्रमुखाचे स्वतंत्र प्रशिक्षण घेण्यात यावे. त्यासाठी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांना बोलावुन कडधान्य उत्पादनाबाबत सखोल माहिती देण्यात यावी.

४. सर्वसाधारणपणे २० हे.चे गट तयार करुन प्रत्येक २० हे.मागे गटप्रमुख म्हणुन एका प्रगतिशील शेतक-याची निवड करण्यात यावी म्हणजेच एका प्रकल्पामध्ये सर्वसाधारण २५ गट तयार करुन त्याचे प्रत्येकी १ प्रमाणे २५ गटप्रमुखांची निवड करावी व गट प्रमुखांचे एक दिवसाचे हंगामापुर्व तांत्रीक प्रशिक्षण घेण्यात यावे.

५. मे महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये गटातील सर्व शेतक-यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण घेण्यात यावे

६. **प्रपत्र-२** मध्ये प्रकल्पामध्ये राबवावयाचा कार्यक्रम देण्यात आलेला आहे. त्यापैकी पिक प्रात्यक्षिकासाठी देण्यात आलेले निविष्ठा पॅकेज गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) गटातील निवडलेल्या सर्व शेतक-यांना त्याचे गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) पीकाचे क्षेत्रानुसार देण्यात यावे.

**गटांचे बळकटीकरण-**

(प्रपत्र २ मधील अ.क्र.११ ते १९ नुसार एक प्रकल्पामध्ये गटांचे बळकटीकरणाअंतर्गत राबवावयाचा कार्यक्रम दिलेला आहे.)

७) कडधान्य पिकांच्या पेरणीपुर्वी, पेरणीनंतर हंगामाच्या मध्यावधी काळात व पीकाचे काढणी पुर्वी असे तीन गटप्रमुखाचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात यावे. यासाठी प्रति प्रशिक्षण वर्गासाठी रु.३३००/- प्रमाणे तीन प्रशिक्षणाचे रु.९९००/- प्रत्येक प्रकल्पासाठी मंजूर करण्यात आले आहेत. गटप्रमुखामार्फत सर्व शेतक-यांना तंत्रज्ञानाची माहिती/संदेश देण्यात यावा.

८) गटप्रमुखाचे मोबाईल क्रमांक घेवुन प्रत्येक आठवडयात एसएमएस व्दारे संदेश देण्यात यावा.

९) शेतक-यांकडुन या प्रकल्पाअंतर्गत करावयाच्या कामाची नोंद गट प्रमुखाने ठेवावी. त्यासाठी त्यांना छोटीसी पुस्तिका करुन देण्यात यावी. त्या पुस्तकेत त्या गटप्रमुखाकडील २० शेतक-यांच्या कडधान्य पिक उत्पादनासाठी हंगामामध्ये राबविलेल्या सर्व बाबीची इत्यभूत माहिती नोदंविण्यात यावी.

१०) कडधान्य उत्पादन वाढीसाठी येणारे अडथळे, कडधान्य उत्पादन वाढीतील पिकाचे महत्वाचे टप्पे व त्यासाठी नेमकेपणाने अवलंब करावयाच्या तंत्रज्ञानाबाबत गट प्रमुखांना तसेच सर्व शेतक-यांना जाणीवपुर्वक व वेळेवर माहिती देण्याच्या दृष्टीने कृषि अधिकारी/कृषि पर्यवेक्षक यांनी सनियत्रंण करावे.

११) पीक वाढीचे काळात योग्य तंत्रज्ञानाचा वापर वेळेवर केला किंवा कसे याची माहिती गट प्रमुखानी ठेवावी. कृषि पर्यवेक्षक/कृषि अधिकारी यांनी प्रत्येक आठवडयास सदरील पुस्तिकेतील नोंदी तपासाव्यात. या प्रकल्पात घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिकाचे पीक कापणी प्रयोग कृषि पर्यवेक्षक/कृषि अधिकारी यांनी त्यांचे उपस्थितीत आयोजित करावेत व पीक उत्पादनाची नोंद घ्यावी.

http://mahaagri.gov.in/

**-: संमती पत्र :-**

**तालुका कृषि अधिकारी.................................** **ठिकाण-**

**दिनांक-**

**व्दारा- मंडळ कृषि अधिकारी.............................**

**विषय- गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रमात (अे३पी) सहभागी होणेबाबत.**

वरील विषयानुसार .....................तालुक्यातील गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रमांतर्गत............ पिकाची निवड झाले बाबत मला गावचे कृषि सहाय्यकामार्फत समजले असुन मी प्रकल्पात सहभागी होवू इच्छितो. मी ...................हे पीक वर्षानुवर्षे घेत असुन माझी..................... पीकाची उत्पादकता एकरी.................किलो असुन मी ती उत्पादकता...............साध्य करण्यासाठी कृषि विभागामार्फत मला खालील तंत्रज्ञान सांगितले असुन त्याचा अवलंब मी करण्यास तयार आहे.

१) पेरणीपूर्व मशागत करणे.
२) पेरणीपूर्व शेणखत एकरी ५ बैलगाडया व जिप्सम वापरणे.
३) पेरणीपूर्व शेतात मृतस-यांचे आधारे वाफे तयार करणे.
४) पेरणीसाठी २ चाडी पाभरीचा वापर करुन खते देणे.
५) बिजप्रक्रीया करणे.
६) पेरणीनंतर पाण्यासाठी दंड पाडणे.
७) फुलांचे अवस्थेत व शेंगा भरण्याचे अवस्थेत युरिया २ टक्कयाची फवारणी करणे.
८) मावा तुडतुडे व फुलकिडे नियंत्रणासाठी दोन किटकनाशकाच्या फवारण्या देणे.
९) भुरी रोगासाठी सल्फरची फवारणी करणे.
१०) वीस व पस्तीस दिवसानंतर दोन वेळेस फवरणी करणे.
११) या व्यतिरिक्त कृषि विभागाकडून वेळोवेळी दिलेल्या माहितीनुसार आवश्क त्या तंत्रज्ञान बाबी अवलंबेल.

वरील तंत्रज्ञानासंदर्भात मला खालील निविष्ठा १०० टक्के अनुदानावर मिळालेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) जिप्सम- | किलो | २) झिंक सल्फेट- | किलो |
| ३) फेरस सल्फेट- | किलो | ४)रायझोबियमकल्चर- | ग्रॅम |
| ५) पी.एस.बी- | ग्रॅम | ६) डि.अे.पी- | किलो |
| ७) डायमेथोएट - | मिली | ८) प्रकाश सापळे | (२ हेक्टर साठी एक) |
| ९) बियाणे - | प्रतिकिलो अनुदानावर व उर्वरित पूर्ण अनुदानावर. | | |

वरील निविष्ठांचा वापर मी प्रात्यक्षिकांसाठी करणार आहे. यातील खते, औषधांचा वापर माझे किंवा इतरांचे प्रात्यक्षिकांच्या क्षेत्राव्यतीरिक्त करणार नाही. तसेच वरील सर्व तंत्रज्ञानांचा वापर करणेस तयार आहे. तंत्रज्ञानांचा वापर न करणे किंवा निविष्ठांचा वापर केला नाही तर माझे प्रात्यक्षिकांवर झालेला खर्च रुपये............मी शासनांस परत करण्यास बांधील राहिल. तरी माझी निवड प्रकल्पांत करावी ही विनंती.

**सही-**
**शेतक-यांचे नाव-**
**गांव-**
**संपर्क नंबर-**

http://mahaagri.gov.in/

## प्रकल्पनिहाय राबवावयाचा कार्यक्रम

प्रकल्प निहाय राबवावयाच्या कार्यक्रमाची माहिती प्रपत्र-२ मध्ये दिली आहे. उपविभागीय कृषि अधिकारी गट यांनी गटप्रमुखांच्या सहाय्याने तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी व संबधित गाव ज्यांचे कार्यक्षेत्रात येते ते कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक तसेच निवडलेले शेतकरी गटप्रमुखाचे सहाय्याने राबवावयाच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे. तसेच त्याचे वेळापत्रकही तयार करण्यात यावे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ यांचे क्षेत्रीय अधिका-यांशी संपर्क साधुन निविष्ठांचा पुरवठा कोणत्या ठिकाणी करावयाचा आहे याची माहिती द्यावी व निविष्ठा पुरवठयाचे नियोजन करण्यात यावी.

## गटांचे बळकटीकरण

**१) प्रशिक्षण-** यापैकी प्राथमिक प्रशिक्षण व गटप्रमुखांचे प्रशिक्षण बाबत माहिती वरिल परिच्छेद क्र.५ व ७ मध्ये देण्यात आली आहे.

**२) शेतकरी शेतीशाळा धर्तीवर शेतकरी प्रशिक्षण- (मास्टर ट्रेनर यांनी घ्यावयाच्या)** शेतकरी शेतीशाळा खरीप हंगामामध्ये तूर पिकासाठी व रब्बी हंगामामध्ये हरभरा पिकासाठी आयोजन करण्यात याव्यात.

- शेतकरी शेतीशाळा धर्तीवर शेतकरी प्रशिक्षण राबवावयाचे आहेत. याची खालीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी. प्रत्येक लघु प्रकल्पामध्ये १ शेतीशाळा याप्रमाणे आयोजित करण्यात याव्यात.
- निवडलेल्या जिल्हयात प्रति शेतीशाळा रु.१७०००/- प्रती प्रशिक्षण आर्थिक तरतूद राहील.
- अधिक उत्पादन व उत्पादकता घेणेसाठी शेतक-यांना प्रत्यक्ष शेतावर अद्ययावत माहिती पुरविणे.
- शेतीचे उत्तम दर्जाचे तंत्रज्ञान देणे हा शेतीशाळेचा मुख्य हेतु आहे.
- कडधान्य पिकांच्या शेतीशाळेमध्ये शेतक-यांना त्यांच्या शेतावर हंगामामध्ये प्रत्येक आठवडयातुन एकदा पिकामध्ये पीक उत्पादन व पिक संरक्षण तंत्राचा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येईल.
- कडधान्य पिक प्रात्यक्षिके/पिकांचे क्षेत्र शेतीशाळेसाठी वापरण्यात यावेत.
- एका शेतीशाळेत एकुण २० प्रशिक्षण सत्रे असतील. त्यापैकी १६ प्रशिक्षण सत्रे प्रत्येक आठवडयाला राहतील व उर्वरीत ४ प्रशिक्षण सत्रे पाक्षिक (पंधरवडा) राहतील.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान जिल्हा स्तरीय समितीने समाविष्ठ असणा-या तालुक्यातील प्रत्येक मंडळासाठी उपलब्ध क्षेत्र व परिस्थीतीनुसार शेतीशाळेचे नियोजन करावे. कृषि विद्यापीठे, केंद्र शासनाच्या संस्था, येथील दोन कृषि तज्ञ प्रत्येक शेतीशाळेत असतील. प्रशिक्षणार्थी शेतक-यांची संख्या ३० प्रति शेतीशाळा राहील. प्रत्येक शेतीशाळा तज्ञांच्या सोईच्या वेळेनुसार प्रति दिन ४ ते ५ तासाची असेल.

**शेतीशाळेच्या प्रत्येक प्रशिक्षणाचा बाबनिहाय सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशिल/बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | २ तज्ञांना मानधन रु.७५/- रु.प्रति सत्राप्रमाणे (२० सत्रे) | ३,००० |
| २ | शेतीशाळेसाठी साहित्य, स्टेशनरी व पत्रिका इ. | ४,००० |
| ३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक यांना चहा/अलोपहार रु.१०/- प्रति सत्र प्रति व्यक्ती ३० शेतक-यांकरिता | ६,००० |
| ४ | शेतीदिन व इतर संकीर्ण खर्च | ४,००० |
| | **एकुण खर्च** | **१७,०००** |

http://mahaagri.gov.in/

<u>प्रत्येक प्रकल्पामध्ये १ शेतकरी शेतीशाळा</u>

**३) प्रशिक्षण साहित्य-** प्रशिक्षण साहित्यासाठी प्रति प्रकल्प रु.१००००/- अनुदान देण्यात येत असुन यामधुन तांत्रिक माहिती/प्रकल्प माहिती इ. च्या माहिती पुस्तिका/घडी पुस्तिका शेतक-यांना देण्यात याव्यात.

**४) प्रशिक्षण सभागृह-** शेतकरी प्रशिक्षण तसेच निविष्ठा साठवणुक व वितरणासाठी तीन महिन्याचा कालावधीसाठी भाडेतत्वावर हॉल घेण्यात यावा. यासाठी रु.७५००/- अनुदान मंजूर करण्यात आला आहे.

**५) शेतीदिन-** शेतीदिन कार्यक्रमासाठी रु.१००००/- अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

प्रात्यक्षिके घेतलेल्या ठिकाणी पीकाच्या वेगवेगळया महत्वाच्य वाढीच्या अवस्थेत कमीत कमी दोन वेळा शेतीदिन घेण्यात यावेत व शेतक-यांना त्या पिकाच्या उत्पादन वाढीच्या समास्याविषयी मार्गदर्शन करावे. याप्रसंगी गावातील शेतकरी तसेच तालुक्यातील व जिल्हयातील प्रतिष्ठीत व्यक्ती विशेषतः सभापती, आमदार, खासदार, व मंत्रीमहोदयांना आवर्जुन आमंत्रित करावे. आयोजित केलेल्या शेतीदिनाचा तपशिल कृषि पर्यवेक्षकाने स्वतंत्र वहीत नोंद करुन ठेवावी.

**६) प्रसिध्दी फलक- एकुण चार गटामध्ये महत्वाचे ठिकाणी- एक याप्रमाणे प्रकल्प क्षेत्रात फलक लावण्यात यावा. त्यावर खालील माहिती लिहावी गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) अंतर्गत पीक प्रात्यक्षिक प्रकल्प क्षेत्र-**

- शेतक-यांचे संख्या
- समाविष्ठ गावे
- पीक व वाण
- बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर
- पेरणीची तारीख
- वापरलेली खते
- वापरलेले सूक्ष्ममुलद्रव्ये

यासाठी प्रति प्रकल्प रु.४०००/- निधी ठेवण्यात आलेला आहे.

**७) मुल्यवृध्दी-** उत्पादित मालाला जास्त भाव मिळण्याचे दृष्टीकोनातुन हि बाब समाविष्ठ करण्यात आली असुन तूरीच्या प्रत्येक प्रकल्पामध्ये दालमिल, पॉलिशर व ग्रेडर या उपकरणांचे दोन संचासाठी प्रति संच किंमतीच्या ५० टक्के किंवा रु.७५०००/- या पैकी जे कमी असेल ते अनुदान मंजुर करण्यात यावे. सदर संच महिला/स्वयंसहायता गटांना ५० टक्के अनुदानावर देण्यात यावे. यामधुन शेतक-यांचे मुल्यवृध्दी व्दारे उत्पन्नात वाढ होईल. तसेच रोजगार निर्मिती होईल अशी संकल्पना आहे. या गटांना पणन व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात यावे जेणेकरुन त्यांच्या मालाला चांगला भाव मिळू शकेल.

यासाठी संचालक (नि व गु.नि) यांचे व्दारा परिपत्रीत केलेले दर व खरेदी पध्दतीचा अवलंब करावा.

**८) संकीर्ण-** प्रकल्प आराखडा यशोगाथा, तदअनुषंगित संकिर्ण खर्च व अधिकारी भेटीसाठी प्रती प्रकल्प रु.१६१००/- मंजूर करण्यात आले आहे.

http://mahaagri.gov.in/

**<u>केंद्र शासनाने सदर कार्यक्रमाच्या नोंदी ठेवण्याबाबत पुढीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.</u>**

१) राष्ट्रीय उत्पादकता परिषदेने प्रात्यक्षिकासाठी दिलेल्या प्रपत्रा मध्ये माहिती ठेवावी.
२) मृद परिक्षण अहवाल ठेवण्यात यावेत.
३) बियाणे पुरवठयाबाबतची दिनांक) व इतर सर्व निविष्ठा बाबतची माहिती उपरोक्त प्रमाणे विहित नमुन्यातील साठा नोंदवहीमध्ये नोदंविण्यात यावी.
४) गट प्रात्यक्षिकाच्या ठिकाणी प्रात्यक्षिकाची माहिती असणारा फलक लावण्यात यावा.
५) पिकाचे वाढीच्या विविध अवस्थामध्ये फोटोग्राफ घेण्यात यावेत व ते जतन करण्यात यावेत.
६) उत्पादन व उत्पादकतेबाबतची माहिती नोंदविण्यात यावी व ती जतन करावी.

**भेट नोंदवही:-** भेटी बाबतची स्वंतत्र नोदंवही ठेवुन यामध्ये वरिष्ठ अधिकारी व शास्त्रज्ञ यांनी दिलेल्या सुचनाची नोंद करावी व दिलेल्या भेटीबाबतची स्वाक्षरी घ्यावी.

**लाभार्थी नोंदवही-** लाभार्थी नोंदवहीमध्ये सर्व लाभार्थीची नोंद ठेवून त्यांना दिलेल्या निविष्ठाबाबतची माहिती नमुद करण्यात यावी.

**निविष्ठा तपासणी-** गटास पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठा मधुन निविष्ठा निहाय प्रत्येक बॅचचा एक नमुना रॅण्डम पध्दतीने काढावा व तो प्रयोगशाळेतुन तपासुन घ्यावा. नमुना तपासणीचे प्रमाणपत्र साठा रजिस्टर बरोबर जतन करावे. जर नमुना अप्रमाणित दिसुन आला तर त्या बॅचचे वाटप तात्काळ थांबवावे व तसे कृषि आयुक्तालयास कळवावे.

**सनियंत्रण-** निविष्ठा पुरवठा तसेच इतर बाबीचे सनियंत्रण जिल्हा अन्न सुरक्षा अभियान कार्यकारी समितीव्दारे करण्यात यावे. प्रकल्प व्यवस्थापन समितीने नियमितपणे सनियंत्रण करावे. तसेच वेळोवेळी भेट देणा-या अधिका-यानी याची तपासणी करावी. साठा नोंदवहीमधील नोंदी तपासाव्यात व तसा शेरा मारुन स्वाक्षरी करावी.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात महिन्यातुन किमान एका प्रकल्पास, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ३ प्रकल्पास, उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील ५० टक्के प्रकल्पास व तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व प्रकल्पास महिन्यातून किमान १ वेळा भेट द्यावी व कामकाजाचा आढावा घेवून भेट नोंदवहीमध्ये नोंद ठेवावी व लाभार्थी यादी, साठा रजिस्टर तपासणी करुन स्वाक्षरी करावी.

**अहवाल-** निविष्ठा पुरवठयाबाबत प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवारी पुढील पत्त्यावर **extn3@ rediffmail.com, pesticide@ rediffmail.com, agridext.mah@ nic.in या ई-मेल** व्दारा माहिती देण्यात यावी, तसेच निविष्ठांचा पुरवठा झाल्यानंतर गटनिहाय निविष्ठानिहाय पुरवठयाची माहिती कृषि आयुक्तालयास सादर करावी. **तसेच सोबत दिलेल्या प्रपत्र-१ व २ मध्ये आपले विभाग/जिल्हयाची परिपुर्ण माहिती देण्यात यावी.** याची जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापन समितीवर राहील. याबाबतचे मासिक अहवाल सादर करण्यात यावेत.

क्षेत्रिय अधिकारी व कर्मचा-यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अे३पी गटातील शेतक-यांशी नियमित संपर्क ठेवुन वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

प्रकाश सापळयाची मागणी एनसीआयपीएम या संस्थेकडे नोंदविण्यात येत आहे. जिल्हानिहाय पुरवठा करावयाच्या ठिकाणाची माहिती त्यांना देण्यात यावी.

**खरीप हंगामामध्ये अे३पी प्रात्यक्षिकांसाठी लागणा-या निविष्ठापोटी येणारी किंमत महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळास कृषि आयुक्तालय स्तरावरुन अदा करण्यात येणार आहे. त्यामुळे या निविष्ठा पुरवठयापोटी कोणत्याही देयकाची अदायगी करण्यात येवु नये.**

योजनेतील मंजूर लक्षांकास अनुसरुन आयुक्तालय स्तरावरुन बाबनिहाय दिलेल्या लक्षांकानुसार दिलेल्या योजनेची अंमलबजावणी करणेची आहे. आयुक्तालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही परिस्थीतीत क्षेत्रिय स्तरावरुन बाबबदल करणेत येवू नये.

http://mahaagri.gov.in/

सदर कार्यक्रम राबविण्यासाठी काही अडचणी आल्यास तात्काळ कृषि आयुक्तालयास संपर्क साधावा.

अे३पी प्रात्यक्षिकांसाठी निविष्ठा पुरवठयाची माहिती ठेवण्याची जबाबदारी एका तंत्र अधिकारी/कृषि अधिका-यास देण्यात यावी. त्यांनी पेरणी कालावधी पुर्ण होईपर्यत दररोज दुपारी पर्यत ४ ते ६ च्या दरम्यान कृषि आयुक्तालयास **दुरध्वनी क्र.०२०-२५५३७६९७** वर निविष्ठा पुरवठयासोबत दर्शविल्यानुसार माहिती द्यावी.

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११००५.**

**प्रत-**

१) **विभागीय कृषि सहसंचालक..................विभाग.................** यांना माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव आपणांस सुचित करण्यात येते की, अे३पी गट प्रात्यक्षिकासाठी लागणा-या निविष्ठा वेळीच पोहचतील याची आपण पुरवठादार संस्था व क्षेत्रिय अधिकारी यांचेशी सपर्क साधुन दक्षता घ्यावी. आपण व विभागीय स्तरावरील अधिका-यांनी वेळोवेळी अे३पी गटांना भेटी देऊन संनियत्रण करावे. भेटीच्या वेळी साठा नोंदवहीतील नोंदी तपासुन पहाव्यात व शे-यामध्ये तशी नोंद करावी.

२) **मा. प्रधान सचिव (कृषि) कषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

३) कृषि संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ,राजन हाऊस, प्रभादेवी, मुंबई-४०००२५. माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

५) मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बियाणे महामंडळ, प्लॉट नं-८, शास्त्रीनगर, अकोला यानां माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

६) मा. व्यवस्थापकीय संचालक, दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग, फेडरेशन लिमिटेड, कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मसजिद बंदर, मुंबई - ४०० ००९ माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

७) मा. संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

८) मा. संशोधन संचालक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

९) मा. संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

१०) मा. प्रमुख शास्त्रज्ञ, कषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि. जालना.

http://mahaagri.gov.in/

| राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (ए ३ पी ) खरीप हंगाम २०१२-१३ जिल्हानिहाय प्रकल्प संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | तुर प्रात्यक्षिके गट संख्या | मुग प्रात्यक्षिके गट संख्या | उडीद प्रात्यक्षिके गट संख्या | एकूण प्रात्यक्षिके गट संख्या |
| १ | ठाणे | ० | ० | ० | ० |
| २ | रायगड | ० | ० | ० | ० |
| ३ | रत्नागिरी | ० | ० | ० | ० |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ० | ० | ० |
| **ठाणे विभाग** | | **०** | **०** | **०** | **०** |
| ५ | नाशिक | १ | १ | १ | ३ |
| ६ | धुळे | ० | २ | १ | ३ |
| ७ | नंदूरबार | १ | १ | १ | ३ |
| ८ | जळगांव | १ | ३ | ४ | ८ |
| **नाशिक विभाग** | | **३** | **७** | **७** | **१७** |
| ९ | अहमदनगर | १ | १ | १ | ३ |
| १० | पुणे | ० | १ | ० | १ |
| ११ | सोलापूर | २ | ० | १ | ३ |
| **पुणे विभाग** | | **३** | **२** | **२** | **७** |
| १२ | सातारा | ० | ० | १ | १ |
| १३ | सांगली | १ | १ | १ | ३ |
| १४ | कोल्हापूर | ० | ० | ० | ० |
| **कोल्हापूर विभाग** | | **१** | **१** | **२** | **४** |
| १५ | औरंगाबाद | ३ | १ | ० | ४ |
| १६ | जालना | २ | ३ | १ | ६ |
| १७ | बीड | ३ | १ | १ | ५ |
| **औरंगाबाद विभाग** | | **८** | **५** | **२** | **१५** |
| १८ | लातूर | ४ | २ | ५ | ११ |
| १९ | उस्मानाबाद | ४ | १ | ५ | १० |
| २० | नांदेड | ३ | ३ | ५ | ११ |
| २१ | परभणी | ३ | ३ | १ | ७ |
| २२ | हिंगोली | १ | १ | १ | ३ |
| | **लातूर विभाग** | **१५** | **१०** | **१७** | **४२** |
| २३ | बुलढाणा | ४ | ४ | ४ | १२ |
| २४ | अकोला | ३ | ४ | १ | ८ |
| २५ | वाशिम | ३ | २ | ३ | ८ |
| २६ | अमरावती | ६ | ४ | १ | ११ |
| २७ | यवतमाळ | ६ | १ | १ | ८ |
| **अमरावती विभाग** | | **२२** | **१५** | **१०** | **४७** |
| २८ | वर्धा | ३ | ० | ० | ३ |
| २९ | नागपूर | ३ | ० | ० | ३ |
| ३० | भंडारा | ० | ० | ० | ० |
| ३१ | गोंदिया | ० | ० | ० | ० |
| ३२ | चंद्रपुर | २ | ० | ० | २ |
| ३३ | गडचिरोली | ० | ० | ० | ० |
| **नागपूर विभाग** | | **८** | **०** | **०** | **८** |
| **एकूण राज्य** | | **६०** | **४०** | **४०** | **१४०** |

## प्रपत्र-२ (अ)

## गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (अे३पी) खरीप हंगाम सन २०१२-१३

| पिक-तूर-६० निविष्ठा पॅकेज प्रति एक हे. | | | | ५०० हेक्टर साठी | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **बाब** | **हेक्टरी मात्रा** | **किंमत/हे (रु.)** | **मात्रा (मे.टन/लि.)** | **किंमत (रु.लाख)** |
| १ | **बियाणे मिनिकिट (कि.ग्रॅ)** | ४ | **३२०.००** | २ | **१.६००** |
| २ | जिप्सम (कि.ग्रॅ.)/गधंक ८० % WDG | २५०.००० | ७५०.०० | १२५.०० | ३.७५० |
| ३ | झिंक सल्फेट (कि.ग्रॅ.) | १५.००० | ५९०.०० | ७.५० | २.९५० |
| ४ | फेरस सल्फेट (कि.ग्रॅ.) | ५.००० | ८१.७९ | २.५० | ०.४०९ |
| ५ | रायझोबियम कल्चर (कि.ग्रॅ.) | ०.२५० | १०.०० | ०.१३ | ०.०५० |
| ६ | पी. एस. बी. कल्चर (कि.ग्रॅ.) | ०.२५० | १०.०० | ०.१३ | ०.०५० |
| ७ | डिअेपी (कि.ग्रॅ.) | १००.०० | २०००.०० | ५०.०० | १०.००० |
| ८ | प्रकाश सापळे (लाईट ट्रॅप) (संख्या) (दोन हेक्टर साठी एक) | १ | ७५०.०० | २५० | ३.७५० |
| ९ | डायमेथोएट | ०.५०० | १५०.०० | २५०.०० | ०.७५० |
| १० | एन.अे.अे | ०.२५० | १४०.०० | १२५.०० | ०.७०० |
| | **एकुण** | | **४८०१.७९** | | **२४.००९** |

## गटाचे बळकटीकरण

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | प्राथमिक प्रशिक्षण गटातील सर्व शेतक-याचे एक दिवस प्रशिक्षण | १ | ०.५०० |
| १२ | गटप्रमुख प्रशिक्षण - २० शेतक-यांच्या गटासाठी---१ गट प्रमुख गटप्रमुख संख्या-२५ गटप्रमुखाचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण रु.२५००/- तज्ञ प्रशिक्षकांचे मानधन रु.४००/- प्रति तज्ञ, | २ | ०.१०० |
| १३ | प्रशिक्षण साहित्य (माहिती पुस्तिका/घडीपत्रीका) | | ०.१०० |
| १४ | शेतकरी शेतीशाळा | १ | ०.१७० |
| १५ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणुक व वितरणासाठी इमारत (३ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर) | १ | ०.०७५ |
| १६ | प्रसिध्दी फलक, एकुण फलक संख्या-४ | ४ | ०.०४० |
| १७ | व्हॅल्यूअडीशन-(दालमिल-, पॉलीशर-, ग्रेडर-) ५० टक्के अनुदानाने शेतकरी गटासाठी एकुण २ संच | २ | १.५०० |
| १८ | शेतीदिन कार्यक्रम | १ | ०.१०० |
| १९ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवस्थेतील फोटो व इतर) | | ०.१६१ |
| | **एकुण** | | **२.७४६** |
| | **एकुण** | | **२६.७५५** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रपत्र-२ (ब)** | | | | | |
| **निविष्ठा पॅकेज प्रति एक हे.** | | | | | |
| **पिक- मूग-४०** | | | | | |
| | | **निविष्ठा मागणी प्रति हे.** | | **५०० हेक्टर साठी** | |
| **अ.क्र.** | **बाब** | **मात्रा/हे.** | **किंमत/हे (रु.)** | **मात्रा (मे.टन/लि.)** | **किंमत (रु.लाख)** |
| | **बियाणे मिनिकिट** | **४** | **३२०** | **२.००** | **१.६००** |
| १ | जिप्सम (कि.ग्रॅ.)/गधंक ८० % WDG | २५०.०० | ७५०.०० | १२५.०० | ३.७५ |
| २ | झिंक सल्फेट (कि.ग्रॅ.) | १५.०० | ५९०.०० | ७.५० | २.९५० |
| ३ | फेरस सल्फेट (कि.ग्रॅ.) | ५.०० | ८१.७९ | २.५० | ०.४०९ |
| ४ | रायझोबियम कल्चर (कि.ग्रॅ.) | ०.२५ | १०.०० | ०.१३ | ०.०५० |
| ५ | पी. एस. बी. कल्चर (कि.ग्रॅ.) | ०.२५ | १०.०० | ०.१३ | ०.०५० |
| ६ | डिएपी (कि.ग्रॅ.) | १००.०० | २०००.०० | ५०.०० | १०.००० |
| ७ | प्रकाश सापळे (लाईट ट्रॅप) (संख्या) (दोन हेक्टर साठी एक) | १.०० | ७५०.०० | २५०.०० | ३.७५० |
| | **एकुण** | | **४५११.७९** | | **२२.५५९** |
| **गटाचे बळकटीकरण** | | | | | |
| ८ | प्राथमिक प्रशिक्षण गटातील सर्व शेतक-याचे एक दिवस प्रशिक्षण | | | १ | ०.५०० |
| ९ | गटप्रमुख प्रशिक्षण - २० शेतक-यांच्या गटासाठी---१ गट प्रमुख गटप्रमुख संख्या-२५ गटप्रमुखाचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण रु.२५००/- तज्ञ प्रशिक्षकांचे मानधन रु.४००/- प्रति तज्ञ, | | | २ | ०.१०० |
| १० | प्रशिक्षण साहित्य (माहिती पुस्तिका/घडीपत्रीका) | | | | ०.१०० |
| ११ | शेतकरी शेतीशाळा | | | १ | ०.१७० |
| १२ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणुक व वितरणासाठी इमारत (३ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर) | | | १ | ०.०७५ |
| १३ | प्रसिध्दी फलक , एकुण फलक संख्या-४ | | | ४ | ०.०४० |
| १४ | शेतीदिन कार्यक्रम | | | १ | ०.१०० |
| १५ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवस्थेतील फोटो व इतर) | | | | ०.१६१ |
| **एकुण** | | | | | **१.२४६** |
| **एकुण** | | | | | **२३.८०५** |

| प्रपत्र -२ (क) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **निविष्ठा पॅकेज प्रति एक हे.** | | | | | |
| **पिक- उडिद-४०** | | | | | |
| | | **निविष्ठा मागणी प्रति हे.** | | **५०० हेक्टर साठी** | |
| **अ.क्र.** | **बाब** | **मात्रा/हे.** | **किंमत/हे (रु.)** | **मात्रा (मे.टन/लि.)** | **किंमत (रु.लाख)** |
| | **बियाणे मिनिकिट** | ४ | **३२०.००** | २ | **१.६००** |
| १ | जिप्सम (कि.ग्रॅ.)/गधंक ८० % WDG | २५०.००० | ७५०.०० | १२५.०० | ३.७५० |
| २ | झिंक सल्फेट (कि.ग्रॅ.) | १५.००० | ५९०.०० | ७.५० | २.९५० |
| ३ | फेरस सल्फेट (कि.ग्रॅ.) | ५.००० | ८१.७९ | २.५० | ०.४०९ |
| ४ | रायझोबियम कल्चर (कि.ग्रॅ.) | ०.२५० | १०.०० | ०.१३ | ०.०५० |
| ५ | पी. एस. बी. कल्चर (कि.ग्रॅ.) | ०.२५० | १०.०० | ०.१३ | ०.०५० |
| ६ | डिएपी (कि.ग्रॅ.) | १००.००० | २०००.०० | ५०.०० | १०.००० |
| ८ | प्रकाश सापळे (लाईट ट्रॅप) (संख्या) (दोन हेक्टर साठी एक) | १.००० | ७५०.०० | २५०.००० | ३.७५० |
| | **एकुण** | ६००० | **४५११.७९** | | **२२.५५९** |
| **गटाचे बळकटीकरण** | | | | | |
| ८ | प्राथमिक प्रशिक्षण गटातील सर्व शेतक-याचे एक दिवस प्रशिक्षण | | | १ | ०.५०० |
| ९ | गटप्रमुख प्रशिक्षण - २० शेतक-यांच्या गटासाठी---१ गट प्रमुख गटप्रमुख संख्या-२५ गटप्रमुखाचे एक दिवस तांत्रिक प्रशिक्षण रु.२५००/- तज्ञ प्रशिक्षकांचे मानधन रु.४००/- प्रति तज्ञ, २ तज्ञास | | | २ | ०.१०० |
| १० | प्रशिक्षण साहित्य (माहिती पुस्तिका/घडीपत्रीका) | | | | ०.१०० |
| ११ | शेतकरी शेतीशाळा | | | १ | ०.१७० |
| १२ | प्रशिक्षण सभागृह/निविष्ठा साठवणुक व वितरणासाठी इमारत (३ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर) | | | १ | ०.०७५ |
| १३ | प्रसिध्दी फलक , एकुण फलक संख्या-४ | | | ४ | ०.०४० |
| १४ | शेतीदिन कार्यक्रम | | | १ | ०.१०० |
| १५ | संकिर्ण (कार्यालयीन खर्च, यशोगाथा, पिकाचे वाढीच्या अवस्थेतील फोटो व इतर) | | | | ०.१६१ |
| **एकुण** | | | | | **१.२४६** |
| **एकुण** | | | | | **२३.८०५** |

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (ए ३ पी )
## जिल्हानिहाय निविष्ठा भौतिक व आर्थिक लक्ष खरीप हंगाम २०१२-१३ (रु.हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | तुर प्रात्यक्षिके गट संख्या | मुग प्रात्यक्षिके गट संख्या | उडीद प्रात्यक्षिके गट संख्या | एकुण प्रात्यक्षिके गट संख्या | तूर (क्विं.) | | मूग (क्विं.) | | उडिद (क्विं.) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | भौतिक लक्ष | आर्थिक लक्ष | भौतिक लक्ष | आर्थिक लक्ष | भौतिक लक्ष | आर्थिक लक्ष |
| १ | ठाणे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | रायगड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | रत्नागिरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **ठाणे विभाग** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| ५ | नाशिक | १ | १ | १ | ३ | २० | १६०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| ६ | धुळे | ० | २ | १ | ३ | ० | ०.०० | ४० | ३२०.०० | २० | १६०.०० |
| ७ | नंदूरबार | १ | १ | १ | ३ | २० | १६०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| ८ | जळगांव | १ | ३ | ४ | ८ | २० | १६०.०० | ६० | ४८०.०० | ८० | ६४०.०० |
| **नाशिक विभाग** | | **३** | **७** | **७** | **१७** | **६०.००** | **४८०.००** | **१४०.००** | **११२०.००** | **१४०.००** | **११२०.००** |
| ९ | अहमदनगर | १ | १ | १ | ३ | २० | १६०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| १० | पुणे | ० | १ | ० | १ | ० | ०.०० | २० | १६०.०० | ० | ०.०० |
| ११ | सोलापूर | २ | ० | १ | ३ | ४० | ३२०.०० | ० | ०.०० | २० | १६०.०० |
| | **पुणे विभाग** | **३** | **२** | **२** | **७** | **६०.००** | **४८०.००** | **४०.००** | **३२०.००** | **४०.००** | **३२०.००** |
| १२ | सातारा | ० | ० | १ | १ | ० | ०.०० | ० | ०.०० | २० | १६०.०० |
| १३ | सांगली | १ | १ | १ | ३ | २० | १६०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| १४ | कोल्हापूर | ० | ० | ० | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | **कोल्हापूर विभाग** | **१** | **१** | **२** | **४** | २०.०० | १६०.०० | २०.०० | १६०.०० | ४०.०० | ३२०.०० |
| १५ | औरंगाबाद | ३ | १ | ० | ४ | ६० | ४८०.०० | २० | १६०.०० | ० | ०.०० |
| १६ | जालना | २ | ३ | १ | ६ | ४० | ३२०.०० | ६० | ४८०.०० | २० | १६०.०० |
| १७ | बीड | ३ | १ | १ | ५ | ६० | ४८०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| | **औरंगाबाद विभाग** | **८** | **५** | **२** | **१५** | **१६०.००** | **१२८०.००** | **१००.००** | **८००.००** | **४०.००** | **३२०.००** |
| १८ | लातूर | ४ | २ | ५ | ११ | ८० | ६४०.०० | ४० | ३२०.०० | १०० | ८००.०० |
| १९ | उस्मानाबाद | ४ | १ | ५ | १० | ८० | ६४०.०० | २० | १६०.०० | १०० | ८००.०० |
| २० | नांदेड | ३ | ३ | ५ | ११ | ६० | ४८०.०० | ६० | ४८०.०० | १०० | ८००.०० |
| २१ | परभणी | ३ | ३ | १ | ७ | ६० | ४८०.०० | ६० | ४८०.०० | २० | १६०.०० |
| २२ | हिंगोली | १ | १ | १ | ३ | २० | १६०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| | **लातूर विभाग** | **१५** | **१०** | **१७** | **४२** | **३००.००** | **२४००.००** | **२००.००** | **१६००.००** | **३४०.००** | **२७२०.००** |
| २३ | बुलढाणा | ४ | ४ | ४ | १२ | ८० | ६४०.०० | ८० | ६४०.०० | ८० | ६४०.०० |
| २४ | अकोला | ३ | ४ | १ | ८ | ६० | ४८०.०० | ८० | ६४०.०० | २० | १६०.०० |
| २५ | वाशिम | ३ | २ | ३ | ८ | ६० | ४८०.०० | ४० | ३२०.०० | ६० | ४८०.०० |
| २६ | अमरावती | ६ | ४ | १ | ११ | १२० | ९६०.०० | ८० | ६४०.०० | २० | १६०.०० |
| २७ | यवतमाळ | ६ | १ | १ | ८ | १२० | ९६०.०० | २० | १६०.०० | २० | १६०.०० |
| **अमरावती विभाग** | | **२२** | **१५** | **१०** | **४७** | **४४०.००** | **३५२०.००** | **३००.००** | **२४००.००** | **२००.००** | **१६००.००** |
| २८ | वर्धा | ३ | ० | ० | ३ | ६० | ४८०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| २९ | नागपूर | ३ | ० | ० | ३ | ६० | ४८०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३० | भंडारा | ० | ० | ० | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३१ | गोंदिया | ० | ० | ० | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३२ | चंद्रपुर | २ | ० | ० | २ | ४० | ३२०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३३ | गडचिरोली | ० | ० | ० | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| **नागपूर विभाग** | | **८** | **०** | **०** | **८** | **१६०.००** | **१२८०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** | **०.००** |
| **एकूण राज्य** | | **६०** | **४०** | **४०** | **१४०** | **१२००.००** | **९६००.००** | **८००.००** | **६४००.००** | **८००.००** | **६४००.००** |

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत गतिमान कडधान्य उत्पादन कार्यक्रम (ए ३ पी )
